स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान यंत्रावरील CLOSE बटनाच्या वापराबाबत..

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ-२०१३/प्र.क्र.११/का.१२
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २९ डिसेंबर, २०२२.

## आदेश

ज्याअर्थी, मतदान पूर्ण झाल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षांकडून अनावधानाने CLOSE बटन दाबण्याचे राहून जाते, मतमोजणीच्यावेळी RESULT - I बटन दाबल्यास "Invalid Operation" असा मेसेज मशीन दाखवते. याचाच अर्थ कंट्रोल युनिटवरील CLOSE बटन दाबण्यात आलेले नाही. यास्तव निकाल दर्शविताना प्रथम CLOSE बटन दाबून त्यानंतर निकाल दर्शविण्याच्या अनुषंगाने आदेश देणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६१ चा महा. ५) च्या कलम ९ए (४), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०ए (४) अनुसार पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षांकडून CLOSE बटन दाबणे राहून गेल्यास, मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी पर्यवेक्षकाने प्रथम TOTAL  बटन दाबून

उपस्थित उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांची कंट्रोल युनिटमध्ये नोंद झालेल्या एकूण मतदानाचा आकडा व्हीएम-३ मधील अ.क्र. ५ मध्ये नोंद असलेल्या एकूण मतदानाच्या आकडेवारीशी जुळत असल्याबाबत खात्री करुन देण्यात यावी व त्यानंतर CLOSE बटन दाबून मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण करुन निकाल जाहीर करावा. सदर बाबीची नोंद व्हीएम-४ मध्ये स्वतंत्र टिप लिहून घेण्यात यावी. याबाबत मतदान यंत्राच्या प्रशिक्षणादरम्यान मतमोजणी पर्यवेक्षकांना योग्य त्या सूचना देण्यात याव्यात.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( के. सूर्यकृष्णमूर्ती )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी
२) आयुक्त, सर्व महानगरपालिका
३) मुख्याधिकारी, सर्व